# बीडमध्ये शिवसेना शिंदे गटाने नगराध्यक्ष पदासाठी जाहीर केलेल्या उमेदवारांमध्ये शितल प्रतिक कांबळे यशस्वी ठरणार!!

बीड ●सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ ●वर्ष २० वे ●पाने ४ http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email:beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

सांज दैनिक बीड वास्तव RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

स्क्रीन रिडरचा बादशहा

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com

https://www.beedvastav.com

# नेहमीच दिसणाऱ्या राजकीय चेहऱ्यांची उबग आल्याने अनिल दादांनी आणलेल्या सामान्य चेहऱ्यापुढे रबरी शिक्के टिकतील का?

## अनिल दादा जगताप यांचा सावध पावित्रा मित्रपक्ष, विरोधकांना कन्फ्युज व गतिमान खेळी खेळायला भाग पाडणार!!

## बीड नगरपालिका निवडणुकीत युती होईल तेव्हा होईल परंतु, अनिल दादांनी नगराध्यक्ष पदांचे उमेदवार देऊन बॉम्ब टाकला!!

## बीड नगरपालिका निवडणुकीत युतीमध्ये अनिल दादा जगताप यांची भूमिका अत्यंत प्रभावी व योग्य दिशा देणारी ठरणार!!



बीड : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सध्या तरी युती होईल, असे कोणतेही स्पष्ट संकेत दिसून येत नसल्यामुळे राज्यात सर्वप्रथम बीडमध्ये नगराध्यक्ष पदांच्या संभाव्य उमेदवारांची यादी जाहीर करून शिवसेना शिंदे गट हा स्वतंत्रपणे नगरपालिका निवडणूकीला ताकदीनिशी सामोरे जाणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत वरिष्ठ नेत्यांच्या आदेशावरून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यामध्ये अत्यंत हालाखीचे दिवस जवळून अनुभवणारे आणि वेटर म्हणून सुरू झालेला हा प्रवास बीड विधानसभा निवडणुकीत अनिल दादा जगताप यांचे प्रवक्ते म्हणून काम पाहणारे आणि अत्यंत सर्वसामान्य चेहरा असलेले प्रतीक शामल कांबळे यांच्या पत्नीच्या नावाची संभाव्य नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली आहे. नेहमीच दिसणाऱ्या राजकीय चेहऱ्यांची उबग आल्याने अनिल दादांनी रबरी शिक्क्यापेक्षा शितल प्रतीक कांबळे हा नवीन सामान्य चेहरा बिडकरांच्या सेवेसाठी दिला आहे. दरम्यान अनिल दादा जगताप यांनी शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्ष पदांच्या संभाव्य उमेदवारांची यादी जाहीर करून जो बॉम्ब टाकला आहे, त्यामुळे साहजिकच मित्र पक्षाला कन्फ्युज करून त्यांना गतिमान खेळी खेळायला भाग पाडले आहे, असे मानले जात आहे.

### बीडकरांसमोर एक आश्वासक नवा चेहरा, नव्या अपेक्षा!

● बीड नगरपरिषद व नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या मुख्य रणनीती बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी नगरपालिका निवडणुकीत सर्व सामान्य घरातील चेहरा निवडून आणणार असा ठाम विश्वास व्यक्त केला. दरम्यान नागराध्यक्ष उमेदवारासाठी तीन इच्छुक उमेदवारांची नावे पण जाहीर केली. या तीन नावात बीडच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पत्रकरिता क्षेत्रात नावारूपाला आलेल्या प्रतिक कांबळे यांच्या सुविद्य पत्नी सौ शितल कांबळे यांचं नाव समोर आले. पत्रकार प्रतिक कांबळे हे नियमित सामाजिक कार्यात सक्रिय असल्याचे आजवर दिसून आले आहेत. तसेच बीड नगरराध्यक्ष म्हणून त्यांच्या पत्नी या सक्षम उमेदवार असतील कारण नवीन, सुसंस्कृत, आणि नेतृत्वशील असणारा चेहरा व कायम बीडकरांमध्ये राहणारे सामान्य घरातील हे दांपत्य बीड मतदारांच्या पसंतीस उतरणार यात तिळमात्र शंका नाही.



### अनिल दादा जगताप ठरतील गेम चेंजर!

● बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी रणशिंग फुंकले असून काल त्यांनी वरिष्ठ नेत्यांची उपस्थितीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या संभाव्य उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. ही यादी जाहीर करून त्यांनी मोठा बॉम्ब टाकला आहे. कारण मित्रपक्ष असलेल्या नेत्यांकडे आणि विरोधकांकडे अद्यापही संभाव्य उमेदवारांची चाचणी सुरू आहे. अशा परिस्थितीत अनिल दादा जगताप यांनी संभाव्य नगराध्यक्षपदांच्या उमेदवारांची घोषणा जी राजकीय खेळी खेळली आहे त्यामुळे मित्र पक्षातील नेत्यांना आणि विरोधकांना कन्फ्युज करणारी तर आहेच शिवाय या अनुषंगाने गतिमान खेळी खेळायला भाग पाडणारी आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अनिल दादा जगताप यांनी रबरी शिक्का न देता नेहमीच दिसणाऱ्या राजकीय चेहऱ्यांची उबग बीडकरांना आल्यामुळे नवीन सर्व सामान्य चेहऱ्याला संधी दिली आहे. यामुळे मित्र पक्षांसह विरोधक चांगलेच बुचकळ्यात पडले असून त्यांची कोंडी झाल्याचे दिसून येत आहेत. तेव्हा सध्याची एकंदरीत राजकीय परिस्थिती पाहता अनिल दादा जगताप नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत गेम चेंजर दिसतील यात शंका वाटण्याचे काहीच कारण नाही.

### एक वेटर ते क्रिएटिव्ह पर्सनॅलिटीचा टॅग मिळविलेलं भन्नाट व्यक्तिमत्व!!

प्रतीक शामल कांबळे यांच्या घरची परिस्थिती जेव्हा अत्यंत हालाखीची होती तेव्हा त्यांनी शहरातील अनविता हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करायला सुरुवात केली. परंतु प्रतीक कांबळे यांचे स्वप्न मोठे होते म्हणून हा प्रवास वेटरवर न थांबता तो प्रवास पुढे वेगाने सुरू झाला. यानंतर प्रतीक कांबळे यांनी नृत्याचे शिक्षण घेतले आणि नृत्य क्लास घ्यायला सुरुवात केली. प्रत्येक क्लास घेत असतानाच ते शहरातील काही नामांकित शाळेत एक शिक्षक म्हणून 16 वर्ष काम केल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये दांडगा संपर्क आला. त्यामुळे साहजिकच विविध नामांकित शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असताना त्यांनी प्रतीथ यश दैनिकात संपादकीय विभागामध्ये काम सुरू करून पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी आपली वेगळी आणि स्वतंत्र शैलीचा पत्रकार म्हणून ओळख निर्माण केली. प्रतीक कांबळे यांनी बीडच्या पत्रकारिता, शैक्षणिक, राजकारणात आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य असणारे उपक्रम राबवून बीडकरांना आजवर आकर्षित केले. म्हणूनच बीडमध्ये प्रतीक कांबळे यांना एक क्रिएटिव्ह पर्सनॅलिटी म्हणून बीडकरांनी टॅग दिला आहे. तर या प्रत्येक उपक्रमामध्ये शितल कांबळे देखील तितक्याच उत्स्फूर्तपणे आपल्या कामातून बीडकारांसमोर सिद्ध झालेले आहे.

### अनिल दादांचे प्रवक्ते म्हणून काम पाहताना शिवसैनिकांशी आला दांडगा संपर्क

● नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत त शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप अपक्ष उमेदवार म्हणून उभा होते तेव्हा प्रतीक कांबळे यांनी त्यांची पूर्ण प्रचार यंत्रणा स्वत:च्या हातामध्ये घेऊन ठिकठिकाणी केलेला प्रचार हा बीडकरांना प्रतीक कांबळे यांच्या राजकीय नेतृत्वाची चाहूल देऊन गेला.

● विधानसभा निवडणुकीदरम्यान प्रतीक कांबळे हे अनिल दादांचे प्रवक्ते म्हणून काम करत होते म्हणून प्रतीक कांबळे एक स्टार प्रचारक म्हणून या निवडणुकीत बिडकर यांच्या समोर सिद्ध झाले आहेत.

### सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानामुळे प्रतीक कांबळे घराघरात पोहोचले!!

● बीडच्या सांस्कृतिक क्षेत्रात नृत्य, नाट्य कलावंत म्हणून प्रतिक कांबळे गेल्या 22 वर्षांपासून सक्रिय असल्याने त्यांची बीड शहरात एक कलाकार म्हणून निर्माण झालेली ओळख व त्यांचा स्वत:चा चाहता वर्ग निर्माण झाला आहे. म्हणून बीडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहांमध्ये जेव्हा प्रतीक कांबळे यांची कुठली कलाकृती सादर होणार असते तेव्हा नाट्यगृह प्रत्येक वेळी तुडुंब भरलेले बीडडकरांना आजवर दिसलेले आहे.

● एक प्रकारे बीडकारांचे हे प्रेम प्रतीक कांबळे यांना वर्षानुवर्ष एक कलाकार म्हणून मिळालेले आहे.

---

अमरसिंह पंडित

## गेवराईत २०० लक्ष रुपये किंमतीच्या शादीखाना बांधकामाचा शुभारंभ

# शादीखान्याच्या इमारतीमुळे गेवराई शहराच्या वैभवात भर पडेल

**गेवराई : प्रतिनिधी**

गेवराई शहरात भव्य, प्रशस्त आणि सर्व सुविधा असलेली शादीखान्याची इमारत गेवराई शहराच्या वैभवात भर घालणारी ठरणार आहे. मुस्लिम समाज बांधवांचे विवाह सोहळे अल्प दरात पार पडावेत, मध्यम वर्गीयांसह गोर-गरीबांनाही मंगल कार्यालयातील विवाह आर्थिकदृष्ट्या परवडला पाहिजे या सामाजिक हेतूने गेवराई शहरात शादीखान्याची उभारणी होत आहे. या बांधकामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या शुभहस्ते दारुलउलूम परिसरात सुमारे २०० लक्ष रुपये किंमतीच्या शादीखाना इमारत बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीनंतर आ.



विजयसिंह पंडित यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर मतदार संघातील विकास कामांना निधी मंजुर करून घेतलेला आहे. गेवराई शहरात दहा महिन्यांच्या कालावधीत चाळीस कोटी रुपयांची विकास कामे सुरु आहेत. अल्पसंख्यांक समाजाची मागणी आणि निवडणुकीत दिलेले आश्वासन लक्षात घेता आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई शहरातील ● पान ३ वर...

## कुलूप तोडून 5 लाख 81 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले

### अज्ञात व्यक्ती विरुद्ध केज पोलिसांत गुन्हा दाखल

**केज : प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कोरेगाव शिवारातील वैतागवस्ती येथील शेतकरी बळीराम तांदळे हे कुटुंबातील सर्वांना घेवून भाऊबीजेच्या दिवशी घरा शेजारी असलेल्या शेतात गेले आसता अज्ञात चोरट्यानी त्यांच्या राहत्या घराच्या चॅनल गेटचे कुलूप तोडून पेटीत व धान्याच्या कोठीत ठेवलेले ५ लाख ८१ हजार ५०० रुपयाचे घरात ठेवलेले २७ तोळ्याचे सोन्याचे दागिने




चोरून नेल्याची घटना घडली आसून या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. केज तालुक्यातील कोरेगाव शिवारातील ● पान ३ वर...

# केवळ ऑपरेशन सिंदूर नाही तर आर्थिक आघाडीवर पाकिस्तान बरबाद

## गुंतवणूक काढून जागतिक कंपन्यांचे पाकिस्तानातून पलायन सुरूच



प्रतिनिधी : ऑपरेशन सिंदूरनंतर आता भारत आर्थिक आघाडीवरही पाकिस्तानची पीछेहाट करत आहे. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, भारत विक्रमी पातळीवर परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट विस्तार आकर्षित करत असताना पाकिस्तानमध्ये मात्र आर्थिक आघाडीवर विविध क्षेत्रांमध्ये जागतिक कंपन्यांची सातत्याने माघार दिसून आली आहे. भारत विक्रमी पातळीवर परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट विस्तार आकर्षित करत असताना, पाकिस्तानमध्ये विविध क्षेत्रांमध्ये जागतिक कंपन्यांची माघार सतत दिसून येत आहे. तर दुसरीकडे भारत उत्कर्षाकडे आगेकूच करत आहे. एका प्रसारमाध्यमांनी छापलेल्या लेखानुसार, हा विरोधाभास केवळ समष्टि आर्थिक ट्रेंडच नाही तर गुंतवणूकदारांचा विश्वास आणि दीर्घकालीन धोरणात्मक निर्णयांना आकार देणारी अंतर्गत व्यवसाय संस्कृती, नियामक चौकटी (Compliance Framework) आणि संस्थात्मक क्षमता देखील प्रतिबिंबित करतो. लेखात म्हटल्याप्रमाणे जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असूनही पाकिस्तानला प्रमुख आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे हित टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. प्रॉक्टर अँड गॅम्बल (पी अँड जी) ने पाकिस्तानमधील उत्पादन आणि व्यावसायिक कामकाज बंद करण्याची अलीकडची घोषणा व्यापक आव्हानांचे प्रतीक आहे, असे प्राध्यापक पेमा ग्याल्पो यांच्या लेखात म्हटले गेले. पी अँड जीची माघार शेल, फायझर, टोटल एनर्जी, टेलिनॉर आणि मायक्रोसॉफ्टच्या अशाच हालचालींनंतर आहे.

दुसरीकडे प्रमुख जागतिक कंपन्या भारतात त्यांचे पाऊल वाढवत आहेत. एअरबस राष्ट्रीय प्राधान्यांशी जुळवून घेत उत्पादन, अभियांत्रिकी आणि प्रशिक्षणात गुंतवणूक करत आहे. वाढत्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी नवीन डेटा सेंटर्सची योजना आखत मायक्रोसॉफ्टने क्लाउड आणि एआय पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी ३ अब्ज डॉलर्सची वचनबद्धता केली आहे. ॲपलने एप्रिल २०२५ मध्येच २२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची उपकरणे एकत्र करून आयफोनचे उत्पादन लक्षणीयरीत्या वाढवले आहे. भारतातील सर्वात मोठ्या नियोक्त्यांपैकी एक असलेली अमेझॉन महाराष्ट्रात क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये अतिरिक्त ८.२ अब्ज डॉलर गुंतवणूक करत आहे. एनटीटी डेटाने भारतात त्यांचे सर्वात मोठे डेटा सेंटर कॅम्पस सुरू केले आहे, तर VinFast LLC तामिळनाडूमध्ये २ अब्ज डॉलरचा ईव्ही उत्पादन प्रकल्प बांधत आहे.

पाकिस्तानची आर्थिक स्थिती खालावली आहे. उपलब्ध माहितीनुसार, टोटल एनर्जीजने टोटल पार्को पाकिस्तान लिमिटेडमधील आपला हिस्सा सिंगापूरस्थित गनव्होर ग्रुपला विकला. अयशस्वी विलीनीकरणाच्या प्रयत्नानंतर, टेलिनॉरने त्यांचे पाकिस्तान ऑपरेशन्स पाकिस्तान टेलिकम्युनिकेशन कंपनी लिमिटेडला विकण्यास सहमती दर्शविली, जरी नियामक मंजुरींमुळे व्यवहाराला विलंब झाला.

पाकिस्तानमध्ये २५ वर्षे राहिल्यानंतर, मायक्रोसॉफ्टने जुलै २०२५ मध्ये शांतपणे त्यांचे ऑपरेशन्स बंद केले होते. हे एक्झिट विविध क्षेत्रांमध्ये, ग्राहकोपयोगी वस्तू, ऊर्जा, औषधनिर्माण, दूरसंचार आणि तंत्रज्ञानाचा समावेश करतात, जे क्षेत्र–विशिष्ट समस्यांऐवजी पद्धतशीरपणे सूचित करतात. उद्योग नेत्यांनी उच्च वीज खर्च, नियामक अनिश्चितता आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे हे प्रमुख प्रतिबंधक घटक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

जिलेट पाकिस्तानचे माजी सीईओ साद अमानुल्लाह खान यांनी यापूर्वी प्रसारमाध्यमांना नमूद केले की अशा एक्झिट धोरणकर्त्यांसाठी एक जागृतीचा इशारा म्हणून काम करतील. विश्वासार्ह लॉजिस्टिक्सचा अभाव, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि मंजुरींमध्ये विलंब यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना कार्यक्षमतेने काम करणे कठीण झाले आहे.

भारतातील औषध क्षेत्र देखील भरभराटीला येत आहे. एली लिली कॉन्ट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंगमध्ये १ अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक करत आहे आणि हैदराबादमध्ये जागतिक क्षमता केंद्र स्थापन करत आहे. कंपनी भारताला नवोपक्रम आणि उत्पादनासाठी एक प्रमुख केंद्र म्हणून स्थान देत आहे.

मात्र दुसरीकडे औषध क्षेत्रात पाकिस्तानला विशेष फटका बसला. बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांना किंमत बदल मंजुरींमध्ये दीर्घकाळ विलंब आणि पाकिस्तान औषध नियामक प्राधिकरण कडून नियामक अडथळ्यांचा सामना करावा लागला आहे. विसंगत अंमलबजावणी, पारदर्शकतेचा अभाव आणि जुनी जाहिरात मानके यामुळे नवोन्मेष आणि गुंतवणुकीला निराशा झाली आहे. ही आव्हाने समष्टिगत आर्थिक अस्थिरता, चलन घसरण, चलनवाढ आणि परकीय चलनाची मर्यादित उपलब्धता यामुळे वाढली आहेत, ज्यामुळे नफा कमी होतो आणि आर्थिक नियोजन गुंतागुंतीचे होते असे तज्ज्ञांचे मत आहे. लेखात अधोरेखित केले आहे की उलट भारत जागतिक गुंतवणुकीसाठी एक पसंतीचे ठिकाण म्हणून उदयास आले आहे. केवळ आर्थिक वर्ष २४–२५ मध्ये, भारताने स्थिर आर्थिक वाढ, वेगाने वाढणारा मध्यमवर्ग आणि व्यवसाय–अनुकूल धोरणात्मक वातावरण यामुळे ८१ अब्ज डॉलर्सची परदेशी गुंतवणूक आकर्षित केली. 'मेक इन इंडिया', डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार आणि कर सुधारणांसारख्या सरकारच्या सक्रिय उपक्रमांनी कॉर्पोरेट विस्तारासाठी अनुकूल वातावरण तयार केले आहे.

प्रमुख जागतिक कंपन्या भारतात त्यांचे पाऊल वाढवत आहेत. एअरबस राष्ट्रीय प्राधान्यांशी जुळवून घेत उत्पादन, अभियांत्रिकी आणि प्रशिक्षणात गुंतवणूक करत आहे. वाढत्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी नवीन डेटा सेंटर्सची योजना आखत मायक्रोसॉफ्टने क्लाउड आणि एआय पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी ३ अब्ज डॉलर्सची वचनबद्धता केली आहे.

# सलमान खानच्या रियाधमधील भाषणावर वाद: पाकिस्तानच्या दहशतवादी यादीत नाव असल्याचे दावे खोटे



मुंबई : बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या अलीकडील एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमातील विधानामुळे सोशल मीडियावर वाद निर्माण झाला आहे. सलमान खानने रियाधमधील जॉय फोरम २०२५ मध्ये शाहरुख खान आणि आमिर खान यांच्यासोबत पॅनेलवर उपस्थित असताना मध्यपूर्वेत काम करणाऱ्या दक्षिण आशियाई समुदायाचा उल्लेख करताना बलुचिस्तानला स्वतंत्र प्रदेशाप्रमाणे दाखवले, ज्यामुळे वाद निर्माण झाला.

सलमान खानने पॅनेल चर्चेदरम्यान म्हटले : "जर तुम्ही आत्ताच हिंदी चित्रपट तयार केला आणि तो सौदी अरेबियात प्रदर्शित झाला, तर तो नक्कीच सुपरहिट ठरेल. तसेच, तमिळ, तेलुगू किंवा मल्याळम चित्रपटही या प्रदेशात प्रचंड यश मिळवतील, कारण येथे आपल्या देशांतील अनेक लोक, तसेच बलुचिस्तान, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील लोक काम करत आहेत."

या विधानामुळे सोशल मीडियावर अनेकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. काहींनी सलमानच्या शब्दांचा अर्थ वेगळ्या प्रकारे लावला, तर काहींनी त्यांच्या निवडीवर टीका केली.

### पाकिस्तानकडून दहशतवादी यादीत समावेशाचा दावा

सोशल मीडियावर सलमान खानला पाकिस्तानच्या 'चौथ्या शेड्यूल' मध्ये दहशतवादी म्हणून समाविष्ट केले असल्याचे खोटे दावे पसरले. काही पोस्टमध्ये १६ ऑक्टोबर २०२५ ची एक कथित अधिसूचना शेअर केली जात आहे, ज्यात सलमान खानला "आझाद बलुचिस्तान फॅसिलिटेटर" यादीत टाकण्यात आल्याचे म्हटले आहे.

वास्तविक, कुठल्याही अधिकृत पाकिस्तानी सरकारी किंवा मिडिया स्रोताने अशा घोषणेची पुष्टी केलेली नाही. या ऑनलाइन प्रसारित कागदपत्रांची सत्यता पडताळली गेली नाही, ज्यामुळे ती बनावट असण्याची शक्यता जास्त आहे.

'चौथा शेड्यूल' ही अशी यादी आहे ज्या व्यक्तींवर दहशतवादाशी संबंध असल्याचा संशय असतो. या यादीत असलेल्या लोकांवर कडक नजर ठेवली जाते, त्यांचे प्रवास निर्बंधित केले जाऊ शकतात, आणि त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते. मात्र, सलमान खानसंबंधी कोणतीही अधिकृत कारवाई पाकिस्तान सरकारकडून झाली नाही.

सलमानने बलुचिस्तानला स्वतंत्र प्रदेश म्हणून उल्लेख केला, जे पाकिस्तानसाठी संवेदनशील ठरले आहे. बलुचिस्तान खनिज संपत्तीने समृद्ध असूनही आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे, आणि स्थानिक लोकांना पाकिस्तानमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो. चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर प्रकल्प आणि ग्वादर बंदरामुळेही लोक असंतुष्ट आहेत. येथील जवळजवळ ७०% लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात. या पार्श्वभूमीवर सलमानच्या विधानामुळे सोशल मीडियावर वाद निर्माण झाला.

सलमान खानचे भाषण फक्त मध्य पूर्वेत भारतीय चित्रपटांचे वाढते प्रभाव आणि विविध देशांमधून आलेल्या कामगारांचा उल्लेख करत होते. तरीही सोशल मीडियावर चुकीच्या दाव्यांमुळे वाद निर्माण झाला आणि लोकांनी त्यांच्या विधानाचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे लावला.

# मध्य रेल्वेद्वारे दिवाळी आणि छठ उत्सवानिमित्त विशेष सेवा

मुंबई (प्रतिनिधी) : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विजय कुमार यांनी सांगितले की, मध्य रेल्वेद्वारे २८ ऑक्टोबर २०२५ रोजी एकूण २३ विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. गाडी क्र. ०१०११ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–नागपूर विशेष, ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१०१३ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस –दानापूर अनारक्षित विशेष, ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१०७९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–गोरखपुर विशेष ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री २२.३० वाजता सुटेल. गाडी क्र. ०११४३ लोकमान्य टिळक टर्मिनस–दानापूर विशेष ही गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १०.३० वाजता सुटेल. क्र. ०१०४३ लोकमान्य टिळक टर्मिनस–मुजफ्फरपुर विशेष ही गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १२.१५ वाजता सुटेल. गाडी क्र. ०४२२५ लोकमान्य टिळक टर्मिनस–वाराणसी विशेष ही गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १६.५५ वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४३१ पुणे–गाझीपूर सिटी विशेष ही गाडी पुणे येथून सकाळी ०६.४० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४१५ पुणे–गोरखपूर विशेष ही गाडी पुणे येथून ०६.५० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४४९ पुणे–दानापूर विशेष ही गाडी पुणे येथून १५.३० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४८३ पुणे–हजरत निजामुद्दीन विशेष ही गाडी पुणे येथून १७.३० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४०३ पुणे–अमरावती विशेष ही गाडी पुणे येथून रात्री १९.५५ वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४०१ पुणे–नागपूर विशेष ही गाडी पुणे येथून रात्री २०.३० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१२०२ हडपसर नागपूर विशेष ही गाडी हडपसर येथून दुपारी १५.५० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४३० हडपसर–लातूर विशेष ही गाडी हडपसर येथून १६.०५ वाजता सुटेल. गाडी क्र. ०७६०८ हडपसर–नांदेड विशेष हडपसर ही गाडी येथून २२.५० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४२१ दौंड–कलबुरगी अनारक्षित विशेष ही गाडी दौंड येथून पहाटे ०५.०० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४५१ कोल्हापूर–कलबुरगी विशेष ही गाडी कोल्हापूर येथून सकाळी ०६.१० वाजता सुटेल. गाडी क्र. ०६२०८ कलबुरगि गाडी–बंगळूरु छावणी विशेष ही गाडी कलबुरगी येथून सकाळी ०९.३५ वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४२२ कलबुरगी–दौंड अनारक्षित विशेष ही गाडी कलबुरगी येथून दुपारी १६.१० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४५२ कलबुरगी–कोल्हापूर विशेष ही गाडी कलबुर्गी येथून १८.१० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४२९ लातूर–हडपसर विशेष ही गाडी लातूर येथून ०९.३० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१४१० नागपूर–पुणे विशेष ही गाडी नागपूर येथून १६.१० वाजता सुटेल. गाडी क्र. ०१०१२ नागपूर–छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष ही गाडी नागपूर येथून २२.१० वाजता सुटेल.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.


सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



# वडवणी तालुक्याच्या लेकीचा बळी घेणाऱ्या आरोपींना फाशी द्या -अशोक निपटे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मुख्यमंत्र्याकडे मागणी

➤ वडवणी : प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकरी कन्या असलेल्या डॉक्टर संपदा मुंडे या मुलीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या नराधमांना तत्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणीच्या वतीने वडवणी तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी निवेदन पाठविण्यात आले. या निवेदनातून मागणी करण्यात आली की वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची मुलगी असलेली डॉक्टर संपदा हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करीत मोठ्या धैर्याने शिक्षण घेतलं होतं. डॉक्टर झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात नोकरी लागली होती मात्र तेथील पोलीस अधिकाऱ्याने तिचा जाणीवपूर्वक छळ केला. वेळोवेळी झालेल्या छळाला वाचा फोडण्यासाठी तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. मात्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देखील लक्ष दिल नाही. वरिष्ठांकडे तक्रार केल्याचे माहिती झाल्यानंतर फलटणच्या पोलिसांनी तिला अधिकच त्रास देणे सुरू केले. या त्रासाला कंटाळून तिने अखेर आत्महत्या केली. तिच्या आत्महत्यास कारणीभूत ठरलेले पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष अशोक निपटे यांनी पोलीस प्रशासन आणि शासकीय यंत्रणेवर कडाडून टीका केली.

यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे सर, डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतीश मुजमुले, पत्रकार संघाचे तालुका सचिव अर्जुन मुंडे, ज्ञानेश्वर लंगे, अशोक फपाळ, प्राध्यापक सोमेश्वर कोदुळे, शेख एजाज, शंकर झाडे, विष्णू डोईफोडे, संपादक हनुमंत म्हात्रे, भैय्यासाहेब काकडे, शांतिनाथ जैन, गंगाभिष्म अंडील आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी तहसीलदार मंगेश बुचडे यांना निवेदन देण्यात आले.

### महाराष्ट्र आता गुन्हेगारांचं राज्य: प्रा. काकडे

पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास काकडे सर यांनी देखील यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना महाराष्ट्र राज्यातील महिला मुलीवर होणाऱ्या अत्याचारांची मालिका सांगितली. महाराष्ट्र राज्य हे गुन्हेगारांचा राज्य झाल आहे. या राज्यात लेकीबाळी आता सुरक्षित राहिलेल्या नाहीत. असा थेट आरोप करीत त्यांनी राज्याचे गृहमंत्री असलेले मुख्यमंत्री बघ्यांच्या भूमिकेत दिसत आहेत. अशी टीका त्यांनी केली.

# महिला डॉक्टरच्या मृत्यूपूर्वी पीएसआय बदने, बनकर यांच्यात व्हाट्सअप कॉल

## पीएसआय बदने व बनकरला पोलिसी खाक्या दाखवून माहिती उलगडण्याचा प्रयत्न

## बदनेचे महिला डॉक्टर सोबत कोणत्या पद्धतीचे संबंध होते? हे सांगणे टाळले!!

➤ सातारा : प्रतिनिधी





फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्या पूर्वी या प्रकरणातील संशयित आरोपी पीएसआय गोपाल बदने व प्रशांत बनकर यांच्यात व्हाट्सअप कॉल वरून संभाषण झाल्याची नवी माहिती समोर आली आहे. त्यामुळे पोलीस आता या दोघांची कसून चौकशी करीत असून त्यांच्यात नेमकी कोणती चर्चा झाली याचा धुंडाळा घेत आहेत. विशेष म्हणजे पीएसआय बदने व प्रशांत बनकर यांना पोलिसी खाक्या दाखवून माहिती उघडण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत. दरम्यान या घटनेच्या पार्श्वभूमीवर महिला डॉक्टरच्या आत्महत्येपूर्वी या दोघात व्हॉट्सॲप वरून प्रदीर्घ वेळ संभाषण झाल्याचे समोर आले आहे.

**प्रदीर्घ वेळ व्हॉट्सॲपवरून संभाषण**

पीएसआय गोपाल बदने व प्रशांत बनकर या दोघात महिला डॉक्टरच्या आत्महत्येपूर्वी बराच वेळ फोनवरून चर्चा झाली. ही चर्चा सामान्य फोन कॉलवरून नव्हे तर व्हॉट्सॲप कॉलवरून झाली. त्यामुळे या दोघात या घटनेशी संबंधित मुद्द्यांवरच चर्चा झाल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे आता ते या दोघांना पोलिसीखाक्या दाखवून ही माहिती उलगडण्याचा प्रयत्न करत आहेत. तुर्त पीएसआय बदने हा महिला डॉक्टर सोबत आपले कोणत्या पद्धतीचे संबंध होते? हे सांगणे टाळत आहे.

**पोलिसांपुढे बदनेच्या तोंडून सत्य वदवून घेण्याचे मोठे आव्हान** : पोलीस महिला डॉक्टरने आत्महत्येपूर्वी तळ हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमधील हस्ताक्षर त्यांचेच आहे का? हे ही तपासून पाहत आहेत. पण आरोपी स्वत: पोलीस उपनिरीक्षक असल्यामुळे त्याला या प्रकरणाची चौकशी कशी होणार? कोर्टात काय व कसा युक्तिवाद होणार? आदी गोष्टींची पुरेपूर कल्पना आहे. त्यामुळे पोलिसांपुढे त्याच्या तोंडून सत्य वदवून घेण्याचे मोठे आव्हान आहे.

# नवगाव जि. प. सर्कलमधून अल्पसंख्यांक उमेदवार द्या !

## आ. विलास बापू भुमरे यांच्याकडे आग्रही मागणी

➤ विहामांडवा : इम्तीयाज शेख





नवगाव जिल्हा परिषद सर्कल मधून शिवसेनाकडुन (शिंदे गट) खासदार संदीपान भुमरे यांचे निकटवर्तीय व आमदार विलासबापु भुमरे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते शेरुभाई पटेल यांना उमेदवार द्यावा, अशी मागणी खासदार संदीपान भुमरे व आमदार विलासबापु भुमरे यांच्याकडे नवगाव येथील कार्यकर्तांनी केलेली आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषदसाठी इच्छुक उमेदवारांनी आपापल्या पक्ष श्रेष्ठीकडे आतापासूनच विनवणी सुरू केलेली आहे. उमेदवार जाहीर होण्यापासून तर मागील पाच वर्षांमध्ये केलेले कार्य याची रूपरेषा इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्ठींकडे सादर करत आहे. त्या अनुषंगाने पैठण तालुक्यातील नवगाव जिल्हा परिषद गटामध्ये अल्पसंख्यांक समाजाची संख्या जास्त असल्यामुळे शिवसेनाकडुन जर रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाने माजी संचालक शिरुभाई पटेल यांना उमेदवारी दिली तर ते सहजपणे निवडून येऊ शकतो, याची दाट शक्यता आहे. त्यामुळे माजी मंत्री तथा खासदार संदीपान भुमरे व आमदार विलासबापु भुमरे यांनी नवगाव गटामधून शेरुभाई पटेल यांना उमेदवार द्यावा, अशी मागणी नवगाव व गटातील कार्यकर्ते करीत आहेत. गेल्या काही वर्षांपासून मी या परिसरातील सामाजिक, राजकीय तसेच धार्मिक क्षेत्रात कार्यरत आहे. शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर मी सातत्याने आवाज उठवला आहे. या भागातील सर्व समाजबांधवांचा मला पाठिंबा असून पक्षाच्या माध्यमातून नवगाव गटात माझा मजबूत आणि दांडगा जनसंपर्क आहे. त्यामुळे मला जर खासदार संदीपान भुमरे साहेब व आमदार विलासबापु भुमरे यांनी नवगाव जिल्हा परिषद गटातुन संधी दिली तर निवडणूक रिंगणात उतरून संधीचे सोने करून भुमरे साहेब यांच्या माध्यमातून नवगाव सर्कलचा भरपूर विकास कामे करु.





# लासूरला जैन समाजाचा काळ्या फिती बांधून भव्य मूक मोर्चा

## पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांना दिले लेखी निवेदन

➤ गंगापूर : गुलाब वाघ

पुणे शहरातील सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट या सार्वजनिक ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने लबाडीपूर्वक धर्मदाय आयुक्त यांना खोटी व चुकीची माहिती सादर करत विश्वस्त संस्थेची पुणे येथील मोडेल कॉलनी परिसरातील तीन एकर जागा चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने विक्री करून टाकल्यामुळे देशातील समस्त जैन समाज अत्यंत आक्रोषित झाला असून याचा आक्रोश गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथेही पोहोचला असून लासुर स्टेशन येथील सकल जैन समाजाच्या वतीने सोमवारी 27 ऑक्टोबरला सकाळी दहा वाजता हाताला काळ्या फिती बांधून भव्य मूक मोर्चा काढून निषेध नोंदविण्यात आला शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांना लेखी निवेदना देण्यात आले मुक मोर्च्याला जैन मंदिर इथून सुरुवात करण्यात आली त्यानंतर संपूर्ण शहरात मूक मोर्चा निघून छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे निवेदना देऊन मोर्चा विसर्जित करण्यात आला.

**शांतातप्रिय जैन समाजात आक्रोश.....**पुणे शहरातील सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट या सार्वजनिक ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने लबाडीपूर्वक धर्मदाय आयुक्त यांना खोटी व चुकीची माहिती सादर करत विश्वस्त संस्थेची पुणे येथील मोडेल कॉलनी परिसरातील तीन एकर जागा चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने विक्री करून टाकल्यामुळे देशातील जैन धार्मियांत आक्रोश आहे.

# बिडकिन येथे बॅनरच्या वादातून एका १७ वर्षीय तरुणाचा खून

## पोस्टरबाजीतून "चमकोगिरी" करण्याच्या नादात इंजिनीअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या युवकाचा गेला नाहक जीव

➤ पैठण/सर्जेराव खडसन

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जो तो आपल्या पक्षाचे नेत्यांचे पोस्टर (बॅनर) दुसऱ्यापेक्षा भव्य दिव्य कसे लागले जाईल याची अती दक्षता घेतांना दिसत आहे. याच बॅनरच्या माध्यमातून "चमकोगिरी" करण्यात आघाडीवर असणाऱ्या बिडकिन येथे बॅनर फाडल्याच्या शुल्लक कारणावरून दोन गटात झालेल्या तुंबळ हाणामारीत इंजिनियरिंगच्या प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थ्यास नाहक आपला जीव गमवावा लागला आहे.

या विषयी मिळालेल्या माहितीनुसार बिडकीन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात ऋतिक अशोक धर्मे याने शहरातील नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा देणारे बॅनर लावले होते. याच बॅनर समोरासमोर शहरातील ऋषीकेश उर्फ चिमन जाधवच्या मित्रांनी त्याच्या वाढदिवसाचे बॅनर लावले. ऋषिकेश जाधव याने ऋतिक धर्मे याने लावलेल्या बॅनर समोर त्याच्या वाढदिवसाचे बॅनर लावल्याने ऋतिक धर्मे, बजरंग ठाणगे व ऋषिकेश जाधव यांच्यात फोनवर तीव्र वाद झाला होता त्याच रात्री साधारण ११ वाजेच्या सुमारास ऋषीकेश उर्फ चिमन जाधव, संतोष ठाणगे, राहुल ठाणगे, सागर ठाणगे, प्रदीप ठाणगे आणि त्यांच्या सोबतच्या ईतर ३० ते ३५ साथीदारांनी गोरक्षनगर परिसरातील एका घराजवळ गप्पा मारत असलेल्या तन्मय चोरमारे, ऋतिक धर्मे यांच्यावर अचानक हल्ला करून हातातील लोखंडी पाईप, गज व लाकडी दांड्यांनी बेदम मारहाण करण्यात सुरवात केली. यावेळी राहुल ठाणगे याने तन्मयला मिठी मारुन पकडले व संतोष ठाणगे याने त्याच्या डोक्यावर लोखंडी गजाने जोराचा प्रहार केला. सदर प्रहार इतका जोराचा होता की तन्मय हा जागीच रक्तबंबाळ अवस्थेत कोसळला असता उपस्थितांनी तात्काळ तन्मय यास जखमी अवस्थेत शहरातील हॉस्पिटल व त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटल येथे उपचारासाठी हलवले. परंतु उपचारादरम्यान दुसऱ्या दिवशीरुग्णालयात त्याचा दुर्दैवी



मृत्यू झाला. त्यानंतर मृताचे नातेवाईक योगेश दाने यांनी बिडकीन ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून ऋषीकेश उर्फ चिमन जाधव, संतोष ठाणगे, राहुल ठाणगे, सागर ठाणगे, प्रदीप ठाणगे व इतरांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. दुर्दैवी तन्मयच्या मृत्यूनंतर बिडकीन शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उप विभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील तात्काळ घटनास्थळी धाव घेत पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. बॅनर सारख्या शुल्लक कारणावरून एका तरुणाचा नाहक आपला जीव गमवावा लागल्याने पोलिस प्रशासन शहरात स्वयंघोषित दादा भाऊ भाऊ अण्णा यांच्याकडून जागोजागी अनधिकृतरित्या लावल्या जाणाऱ्या बॅनरबाजीला कसा आळा घालतात याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शादीखान्याच्या इमारतीमुळे गेवराई शहराच्या वैभवात भर पडेल

● पान १ वरून . . . दारुलउलूम परिसरात शादीखाना बांधकामासाठी सुमारे २०० लक्ष रुपयांचा निधी मंजुर केला आहे. रविवार, दि.२६ ऑक्टोबर रोजी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते शादीखाना इमारत बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर मुफ्ती मोईनोद्दीन कासमी, बीड नगर परिषदेचे माजी नगरसेवक शेख निजाम, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, डॉ.एस.एस. पटेल, ज्येष्ठ नेते एस.वाय. अन्सारी, जालिंदर पिसाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, अलिकडच्या काळात खाजगी मंगल कार्यालयात विवाह सोहळ्याच्या आयोजनासाठी लागणारा खर्च सर्वसामान्य आणि मध्यम वर्गीयांना आर्थिकदृष्ट्या परवडणारा नाही. गेवराई शहरासह तालुक्यातील मुस्लिम समाजातील विवाह सोहळे अल्प खर्चात आणि सुसज्ज सुविधा असलेल्या मंगल कार्यालयात व्हावेत यासाठी या शादीखान्याची संकल्पना आपण वास्तवात आणली आहे. या इमारतीचे काम अतिशय दर्जेदार करून घेण्यासाठी मी स्वत: वैयक्तिक लक्ष घालणार आहे. समाज बांधवांनी एकत्रितरित्या केलेल्या सामुहिक मागणीमुळे तय्यबनगर भागातील दारुलउलूम येथे हे बांधकाम करत असल्याचे सांगताना अमरसिंह पंडित यांनी शहरात आणखी दोन ठिकाणी सार्वजनिक मंगल कार्यालयाची उभारणी करणार असल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

मुफ्ती मोईनोद्दीन कासमी यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात बोलताना आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे मुस्लिम समाजाच्यावतीने आभार व्यक्त केले. या कार्यक्रमात बीड नगर परिषदेचे माजी नगरसेवक शेख निजाम यांनी बोलताना आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठिशी समाजाने भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन केले. जे.के. कन्स्ट्रक्शनचे बाबुभाई यांनी उपस्थितांचे स्वागत केले.


यावेळी कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक आवेज शरीफ, मंजुर बागवान, दादासाहेब घोडके, कृष्णा मुळे, सय्यद नजीब, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष खालेद कुरेशी, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, शेख शाफे, वसीम फारुकी, सरवर पठाण, ॲड.मनोज हजारे, विजय सुतार, हारून पटेल, मजहर बागवान, शेख सुभान, मोहसीन बागवान, सय्यद मतीन, बाबा शेख, विलास सुतार, संतोष आंधळे, गुफरान इनामदार, अजित इनामदार, शेख सादेक, सोमनाथ गिरगे, पत्रकार आयुब बागवान, अविनाश इंगावले, जावेद शेख, निहाल सय्यद यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कुलूप तोडून ५ लाख ८१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले

● पान १ वरून . . . वैतागवाडी वस्तीवर येथे गुरुवारी (दि.२३ सायंकाळी ४-१५ ते साडे ५-०० वा. दरम्यान बळीराम भगवान तांदळे हे आपल्या पत्नीसह घराशेजारीच असलेल्या शेतात गेले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या लोखंडी चॅनल गेटचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. व घरात ठेवलेल्या पेटी आणि धान्याच्या कोठीत ठेवलेले ८ तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, सोन्याचा हार, नेकलेस, मिनी गंठण, झुंबर, वेल, चैन, अंगठ्या, सोन्याची पोत, नथ, सोन्याची साखळी, सेव्हन पीस, सोन्याचे फुलं, सोन्याच्या काड्या असे एकूण २७ तोळे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे जुने वापरातील दागिने ज्याची किंमत ५ लाख ८१ हजार ५०० रुपये आहे. या दागिन्यांची चोरी करून अज्ञात चोरट्यानी पोबारा केला.

बळीराम तांदळे यांच्या फिर्यादी वरून केज पोलिसात शुक्रवारी मध्यरात्री १२-४५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे करीत आहेत.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | ल्ल | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# जि.प., पं.स.निवडणुकीत माजलगाव मतदार संघात तिरंगी लढती होण्याची शक्यता

## ना युतीची ना पक्ष तिकीटाची पर्वा न करता ईच्छुक उमेदवारांचे जनसंपर्क दौरे सुरू !

माजलगाव : अरविंद ओव्हाळ

महाराष्ट्रात गेल्या कांही वर्षापासुन रखडत पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीची आरक्षण प्रक्रिया पार पडल्याने आता कोणत्या ही क्षणी या निवडणूका जाहीर होऊन होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर ईच्छुक उमेदवार मतदारांच्या गाठीभेटी घेत प्रचार दौरा करत जनसंपर्काबर भर देत असल्याचे दिसत आहेत. या निवडणूका महाराष्ट्रात महायुती व महाविकास आघाडी कशा लढतात. यावर अद्याप कांहीच निर्णय झाला नाही. मात्र राज्यात कांहीही निर्णय झाला तरी माजलगाव मतदार संघात मात्र तिरंगी लढती होण्याची शक्यता राजकीय जाणकार बर्तबत आहेत. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांना आपली स्वतंत्र राजकीय ताकद लावावी लागेल. अशी चर्चा ही मतदार संघात चालु आहे. महाराष्ट्रात २०१७ साली जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका झाल्या होत्या.

त्या निवडणूकींची मुदत संपुन तीन चार वर्षे होत आहेत. मात्र कांही कारणांमुळे या निवडणूका रखडत पडल्या होत्या. कार्यकर्त्यांच्या असलेल्या या निवडणुका लाढवण्यास सर्वच ठिकाणी कार्यकर्ते मोठ्या संख्येत ईच्छुक असतात.

या निवडणुकीसाठीच्या प्रक्रिया पार पाडत असुन, यातील मुख्य प्रक्रिया म्हणजे आरक्षण प्रक्रिया नुकतीच पार पडली. आरक्षण सोडतीत अनेक ठिकाणी काहीं खुशी कंही गम असे आरक्षण पडल्याने कांही जण खुष तर कांही नाराज झाले आहेत. या निवडणुकीसाठी राज्यातील सर्वच राजकीय पक्ष निवडणूक रिंगणात उतरणार असुन, प्रत्येक राजकीय पक्ष आपापली राजकीय ताकद दाखवून देणार आहे. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात अनेक






राजकीय पक्षात राजकीय उलथापालथ होऊन, पक्ष फुटी झाली. त्यानंतर राज्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना एकनाथ शिंदे गट या तीन पक्षांनी एकत्र येऊन महायुती स्थापन केली. तर दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना उध्दव ठाकरे या तीन पक्षांनी एकत्र येऊन महाविकास आघाडी स्थापन केली. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती सहभागी पक्ष व महाविकास आघाडीत सहभागी पक्ष यांनी स्वतंत्र निवडणूका न लढवता महायुती व महाविकास आघाडी यांच्यातच लढत झाली होती. मात्र आता या होऊ घातलेल्या व कार्यकर्त्यांच्या असलेल्या जि.प.व पं.स. निवडणुका स्वतंत्र लढायच्या की विधानसभे प्रमाणे एकत्र लढायच्या यावर अद्याप कांहीच चर्चा झाली नाही. असे असले तरी माजलगाव विधानसभा मतदार संघात मात्र सर्वच राजकीय पक्ष स्वतंत्र निवडणूका लढवतील असे अंदाज राजकीय जाणकार वर्तवत आहेत. या मतदार संघात आ. प्रकाश दादा सोळंके यांचे गेल्या साडे तीन दशकांपासुन वर्चस्व आहे.

ते तब्बल पाचव्या वेळेस आमदार झाले आहेत. त्यामुळे त्यांना मानणारा मोठा मतदार या विधान सभा मतदार संघात आहे. तर दुसरीकडे या मतदार संघात भाजपला मानणारा ही मोठा मतदार आहे. गेल्या कांही दिवसांपासुन अनेक राजकीय घडामोडी घडत आहे. त्यामुळे या मतदार संघातील भाजप कार्यकर्ते महायुतीत राहुन आ. प्रकाश दादा सोळंके यांचे नेतृत्व मान्य करणार नसल्याचे सांगत आहेत. तर दुसरी कडे माजलगाव मतदार संघात सध्या परिस्थितीत भाजपला हक्काचा नेता कुणीच नसल्याने ते कुणाच्या नेतृत्वाखाली वा निवडणूका लढणार अशी चर्चा मतदार करत आहेत. त्यामुळे भाजपाला आता नवीन नेता कोण येणार याकडे कार्यकर्त्यांसह मतदारांचे लक्ष वेधले आहे.

जरी नवीन नेता आला तरी तो आ. सोळंके यांचे नेतृत्व मान्य करणार नाही. अशी चर्चा भाजप कार्यकर्त्यांतुन ऐकावयास मिळते. त्यामुळे भाजप स्वतंत्र पणे या निवडणुकीस सामोरे जाईल असे वाटते.

त्यामुळे महायुतीत फुट पडुन ते स्वतंत्र लढण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीत सध्या तरी फुटीचे चिन्ह दिसत नसुन या मतदार संघात सध्या परिस्थितीत तरी राष्ट्रबादी काँग्रेस शरद पवार गट यांचेच वर्चस्व असल्याचे दिसत असुन, मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली ते निवडणुकीस सामोरे जातील. अशी शक्यता आहे. यावरून सध्या तरी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आ. प्रकाश दादा सोळंके, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यातच तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता आहे.

जरी प्रदेश पातळीवरून एकत्र निवडणूका लढण्याचे आदेश आले तरी तो आदेश माजलगाव मतदार संघात पाळला जाईल की नाही. हे आज तरी कुणीही सांगु शकत नाही. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढतीची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या या तीनच पक्षाचे कार्यकर्ते सध्या मतदारांच्या गाठी भेटी घेऊन, जनसंपर्क दौर्यावर असल्याचे दिसत आहेत.

---

विशेष



# 'गरज पडल्यास शस्त्र'... कबुतरखान्यांवरील बंदीवरून जैन समाज पुन्हा आक्रमक; जैन मुनींचा थेट 'आमरण उपोषणाचा' इशारा

मुंबई : मुंबईतील कबुतरखान्यांवर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे जैन समाज आक्रमक झाला आहे. या निर्णयाविरोधात आता जैन समाजाने एक मोठे पाऊल उचलले आहे. जैन मुनी निलेश चंद्र विजय यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येणार आहे. येत्या ३ नोव्हेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण करण्याचा निर्णय जैन समाजाने घेतला आहे. यापूर्वी, मुनी निलेश चंद्र विजय यांनी १ नोव्हेंबर रोजीच उपोषण सुरू करण्याची घोषणा केली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी त्यांच्या या आंदोलनाला परवानगी नाकारल्यामुळे त्यांना उपोषणाची तारीख पुढे ढकलावी लागली आहे. कबुतरखान्यांवरील बंदी हटवल्याशिवाय हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी भूमिका जैन समाजाने घेतली आहे.

कबुतरखान्यांवरील बंदीविरोधात जैन मुनींनी पुकारलेल्या १ नोव्हेंबरच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारण्यामागे प्रशासनाने दोन प्रमुख कारणे दिली आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. १ नोव्हेंबर हा सुट्टीचा दिवस असल्याने या दिवशी शहरातील कायदा व सुव्यवस्था राखणे पोलिसांसाठी अधिक आव्हानात्मक ठरू शकते. त्याच दिवशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि महाविकास आघाडी या दोन्ही मोठ्या राजकीय पक्षांनीही मतदार याद्या दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी मोर्चाची हाक दिली आहे. एकाच दिवशी दोन राजकीय पक्षांचे मोर्चे आणि जैन समाजाचे आंदोलन यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून जैन मुनींच्या १ नोव्हेंबरच्या आंदोलनाला परवानगी नाकारली, ज्यामुळे त्यांना उपोषणाची तारीख ३ नोव्हेंबरपर्यंत पुढे ढकलावी लागली.

## जैन समाजाच्या मागण्या कोणत्या?

जैन मुनी निलेश चंद्र विजय यांचे आझाद मैदानावर होणारे आमरण उपोषण केवळ कबुतरखान्यांच्या रक्षणापुरते मर्यादित नाही, तर ते व्यापक मागण्यांसाठी आहे. कबुतरांना दाणे टाकणे ही जैन धर्माच्या अहिंसेच्या तत्त्वाशी जोडलेली आणि धार्मिक श्रद्धेचा भाग असलेली परंपरा आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कबुतरखाने बंद झाल्यामुळे अनेक कबुतरे दगावली असल्याचा त्यांचा दावा आहे. यासोबतच त्यांनी मुंबईतील जैन मंदिरांच्या सुरक्षेची आणि संरक्षणाची मागणी केली आहे. मुनी निलेश चंद्र विजय यांनी गोवंश आणि गोरक्षणाच्या मुद्द्यावरही आवाज उठवला आहे. त्यांची सर्वात महत्त्वाची मागणी म्हणजे जैन प्रार्थनास्थळे, कबुतरखाने आणि गोरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने एक स्वतंत्र बोर्ड स्थापन करावे. या मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार जैन समाजाने केला आहे.

## कबुतरखाने बंदीमुळे जैन समाजामध्ये प्रचंड नाराजी

मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याच्या निर्णयामुळे जैन समाजामध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. यामुळे संतप्त झालेल्या जैन मुनी निलेश चंद्र विजय यांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. मुनी निलेश चंद्र विजय यांनी यापूर्वी "गरज पडल्यास शस्त्रे उचलू" असा इशारा दिला होता, ज्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. मात्र, आता त्यांनी शांततामय मार्गाने 'आमरण उपोषणाचे' अस्त्र हाती घेतले आहे. मुंबई पोलिसांनी १ नोव्हेंबरच्या आंदोलनाची परवानगी नाकारल्यानंतरही, जैन मुनींनी आपला निर्धार कायम ठेवला असून ३ नोव्हेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर हे आंदोलन सुरू होणार आहे. या आंदोलनामुळे मुंबईतील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे.

---

# अभिनेत्री तेजस्विनी लोणारीचा साखरपुडा संपन्न! राजकारण सक्रीय असलेल्या कुटुंबाची होणार थोरली सून

मुंबई : बिग बॉस मराठी ४ मधून प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेली अभिनेत्री तेजस्विनी लोणारी लवकरच बोहल्यावर चढणार आहे. शिवसेनेचे नेते समाधान सरवणकर यांच्यासोबत तेजस्विनीचा साखरपुडा झाला आहे. तेजस्विनी आणि समाधान सरवणकर यांच्या नात्याबद्दल तेजस्विनीने याआधी समाजमाध्यमांवर कोणतीच पोस्ट केली नव्हती. मात्र आता साखरपुड्याचे फोटो समाजमाध्यमांवर टाकल्यामुळे तेजस्विनीच्या चाहत्यांना सुखद धक्का बसला आहे. तेजस्विनीने आजवर अनेक मराठी चित्रपट आणि मालिकांमध्ये काम केले आहे. तर समाधान सरवणकर हे शिवसेनेचे माजी आमदार सदा सरवणकर यांचे पुत्र आहेत. सदा सरवणकरांप्रमाणे त्यांचे ज्येष्ठ पुत्र समाधान सरवणकर सुद्धा राजकारणात सक्रिय आहेत. त्यामुळे कलाकार विश्वातील अभिनेत्री आता राजकीय घराण्याची सून होणार आहे.

---

# गोविंदराव तळेकर गुरुजी यांचे वृद्धापकाळाने निधन



माजलगाव : प्रतिनिधी

भावसार समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते व माजी मुख्याध्यापक गोविंदराव माधवराव तळेकर गुरुजी यांना दिनांक २६ रोजी रात्री ३ .४० ए एम वाजता पुणे येथे देवाज्ञा झाली. मृत्युसमयी ते ९० वर्षाचे होते. त्यांचा अंत्यविधी दुपारी १२ वाजता राहते घर महाडकर रेसिडेन्सी, पौंड रोड, कोथरूड पुणे येथुन वैकुंठ स्मशान भुमी, नवी पेठ पुणे येथे करण्यात आला. या प्रसंगी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचे पश्चात पत्नी ३ मुले, मुलगी सूना नातवंडं पतरुंड असा मोठा परिवार आहे.

ते सेवानिवृत्त शिक्षक होते. कल्संबर नवगण राजुरी येथे मुख्याध्यापक होते. एक आदर्श शिक्षक म्हणून ते परिचित होते. त्यांची दोन मुले परदेशात इंजिनिअर तर एक मुंबईत डॉक्टर आहे. मुलगी शिक्षक म्हणून सेवानिृत्त आहे. त्यांचे निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. भावपूर्ण श्रद्धांजली. तळेकर कुटंबियांच्या दु:खात सांज दैनिक बीड वास्तव परिवार सहभागी आहे

---

# आजपासून मुंबईत 'इंडिया मेरीटाईम सप्ताह', केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन





मुंबई : प्रतिनिधी

शंभराहून अधिक देशातील एक लाखापेक्षा अधिक प्रतिनिधी, ५०० प्रदर्शक, २०० पेक्षा अधिक तज्ज्ञ वक्ते, दहा मोठे संलग्न कार्यक्रम, दहा लाख कोटींपेक्षा अधिक गुंतवणुकीच्या संधी... उद्घाटनासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती आणि समारोपादिवशी दोन सत्रात खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग ! संपूर्ण जगाच्या सागरी व्यापार आणि विकासासंदर्भातील महत्त्वाचा कार्यक्रम मानला जाणारा 'इंडिया मेरीटाईम वुईक- २०२५' आजपासून ३१ ऑक्टोबरपर्यंत गोरेगावमधील 'मुंबई एक्झिबिशन सेंटर'मध्ये होत आहे.

भारताच्या सागरी विकासात 'मैलाचा दगड' म्हणून नोंद होणाऱ्या या महासोहळ्याचे यजमानपद केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलवाहतूक मंत्रालयाकडे असले, तरी त्याच्या स्थानिक संयोजन आणि एकूण समन्वयाची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डावर सोपवण्यात आली आहे. राज्याच्या बंदरे व मत्स्यव्यवसाय विकास विभागांतर्गत येणाऱ्या या मंडळाचे नेतृत्व सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांच्याकडे आहे.

देशाच्या बंदर आणि जलवाहतूक क्षेत्राचे मुंबई हे प्रवेशद्वार आहे. देशाची आर्थिक राजधानी आणि ४०० वर्षांपेक्षा अधिक सागरी वारसा लाभलेले शहर म्हणून मुंबईची जगात ख्याती आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि तदनुषंगिक घडामोडींसाठी मुंबईचे नांव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेहमीच चर्चेत असते. सागरी विषयाशी संदर्भातील जगात मोठा आणि महत्त्वाचा असलेला हा सप्ताह त्यामुळेच मुंबईत आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या किनारपट्टीला याचा मोठा लाभ होईल, असे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

मनुष्यजातीचा समुद्र पर्यटनाचा वारसा, जलवाहतुकीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि 'निळ्या क्रांतीला शाश्वत दिशा देण्यासाठी तज्ज्ञांचे विचारमंथन हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य ठरेल, असे केंद्रीय बंदरे आणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी उद्घाटनाला, तर पंतप्रधान मोदी यांनी समारोपाला उपस्थित राहण्याचे मान्य करून या कार्यक्रमाचे देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेले महत्त्व अधोरेखित केले आहे.

---

# २० वर्षानंतर मोटेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात स्नेह मेळावा



माजलगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील मोटेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयातील २००५-६ च्या १० वी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि. २६ आक्टोबर रविवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींने शाळेच्या संपूर्ण परिसरात वृक्षारोपण केले. २० वर्षानंतर झालेल्या या स्नेह मेळाव्यात अनेक जुन्या आठवणींना विद्यार्थ्यांनी उजाळा दिला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले विद्यालयाने दिलेले संस्कार आम्ही जीवनभर विसरू शकत नाही. गुरुंनी दिलेली शिस्त, चिकाटी, सचोटी यामुळेच आम्ही जीवनात घडलो अशी कृतज्ञता व्यक्त करत स्नेह मेळावा पार पडला.

या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम घडवून आणल्यामुळे एकमेकांच्या भावना एकमेकांपर्यंत पोहोचल्या असून यातून विचारांची आदान प्रदान झाली, या स्नेह मेळाव्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो अशा उपस्थित मुख्याध्यापक विट्ठल सोळंके, प्रविण घोडके व गुरुजनांनी शुभेच्छा दिल्या.

या स्नेह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, विद्यार्थिनीने परिश्रम घेतले.

---

# मंजरथ रस्त्याचे काम सहा महिन्यांपासून बंद

## माजलगाव- मंजरथ बस बंद, प्रवाशांची गैरसोय

माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव - मंजरथ रस्ता कामासाठी मनुर रस्त्यावर खोदण्यात आलेल्या खड्यामुळे व त्यामुळे वाहनाने तर सोडाच पायी चालणे देखील कठीण बनले आहे लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

माजलगाव शहरापासून अकरा किलोमीटर अंतर असलेल्या मंजरथ रस्त्याचे काम मागील सहा महिन्यापूर्वी सुरू करण्यात आले होते. याच रस्त्यावर शहरापासून काही अंतर मनुर गावाला जोडणारे आहे. याच ठिकाणी रस्ता कामासाठी मोठमोठे खड्डे खोदून ठेवलेले आहेत परंतु मागील सहा महिन्यापासून खड्डे तसेच रस्ता काम बंद आहे. ठेवलेल्या खड्याने या रस्त्यावरून पायी चालणे अवघड होत आहे. खड्ड्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून सर्वत्र चिखल झाला.

रस्ता कामासाठी खोदून ठेवलेले खडे आणि चिखलमय झालेला रस्ता यामुळे माजलगाव मंजरथ ही बस सेवा देखील मागील अनेक दिवसांपासून बंद आहे त्यामुळे मंजरथ सह आठ ते दहा गावातील ग्रामस्थांना खाजगी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत असून या ठिकाणी त्यांची आर्थिक लुट होत आहे. मंजरथ सह इतर गावातील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे बस सेवा बंद असल्याने शैक्षणिक नुकसान होत आहे.



त्यामुळे दोन चाकीसह चार चाकी गाड्या फसत आहेत, परंतु संबंधित गुत्तेदाराने याकडे पाठ फिरवलेली आहे. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनाचे देखील या रस्त्याकडे दुर्लक्ष आहे. - माजलगाव ते मंजरथ जाणाऱ्या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. खड्डेमय रस्त्यावरून मार्ग शोधताना चालकांना कसरत करावी लागत आहे.

---

कवी इंद्रजित भालेराव

नाखलगावात भूमिपुत्रांचा गुणगौरव सोहळा संपन्न

# गावच्या विकासासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे

माजलगाव : प्रतिनिधी

राजकारणातून खेडी बिघडणार नाहीत याची दक्षता घेऊन गावच्या विकासासाठी तरुणांनी पुढे आलं पाहिजे. नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण करून गावाला प्रगतीच्या दिशेने नेलं पाहिजे असे प्रतिपादन प्रसिद्ध ग्रामीण कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी केले ते तालुक्यातील नाखलगाव येथे आयोजित भूमिपुत्रांच्या गुणगौरव सोहळ्यात बोलत होते.

नाखलगाव येथील शिक्षक-प्राध्यापक एकत्र येऊन गेल्या चार वर्षांपासून दिवाळीत गावातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करतात. यावर्षीच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून कवी इंद्रजित भालेराव हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री ज्ञानोबा गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना भालेराव सरांनी राजकारणामुळे खेडी बिघडत आहेत. गावच्या विकासात अडसर होईल असे राजकारण न करता गावातील सर्व तरुण, नोकरदार, शिक्षक यांनी एकत्र येऊन गावाला नवी दिशा देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे सांगून शिक्षकवृंदांच्या वतीने आयोजित भूमिपुत्रांच्या गुणगौरव सोहळ्याचे आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. यावेळी भालेराव सरांच्या हस्ते कला, क्रीडा, सांस्कृतिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी, स्पर्धा परीक्षा इ. मध्ये यश मिळवलेल्या अजित झोडगे, संजय गायकवाड, दयानंद गवळी, निशा गायकवाड, अस्मिता काटुळे, जयश्री कुकडे, वैष्णवी उंचे, अभिजीत उंचे, शेख निलोफर, राष्ट्रपाल गायकवाड, पृथ्वी सोळंके, विद्या हरणे, सायली विटेकर, सौरभ झोडगे, अनुजा काळे, शरद शिंदे, श्रुती शिंदे, दिग्विजय झोडगे, अभिनव विटेकर, छत्रपती काटुळे, युवराज शिंदे, श्रेयस सोळंके, हर्षवर्धन पवार, भक्ती शिंदे, स्वराज गवळी, विश्वजीत झोडगे, आशिष झोडगे, श्रेया गायकवाड आदी सत्तावीस विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात बालासाहेब झोडगे यांनी नाखलगावचा इतिहास, गावाची वैशिष्ट्ये व गावातील तरुणांनी विविध क्षेत्रात मिळवलेले यश याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम झोडगे आणि प्रा. अक्षय गवळी यांनी केले तर डॉ. रमेश गटकळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाखलगाव विकास प्रतिष्ठानचे प्रा. रमेश गटकळ, कमलाकर झोडगे, नामदेव रत्नपारखे, उत्तम पवार, बालासाहेब झोडगे, अरुण सोळंके, प्रा. राजाराम झोडगे, प्रा. भागवत शिंदे, सौ. संगीता रत्नपारखे, सौ. कालिंदा विटेकर, भागवत पवार, नारायण झोडगे, अनंत काटुळे, अशोक सोळंके, प्रा. अक्षय गवळी, प्रा. रामेश्वर झोडगे, अमोल झोडगे, संजय झोडगे, परमेश्वर शेळके, नितीन झोडगे, औदुंबर ढोले, गणेश गटकळ, विनोद सोळंके, शिवाजी शेळके आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



'इंद्रजीत भालेराव यांच्या कवितांनी नाखलगावकर मंत्रमुग्ध'

● काट्याकुट्याचा तुडवीत रस्ता, माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता; एकुलती एक झाडाची लेक, जिजाऊ शिकते भालाफेक; शेतामंधी खोप तिला बोराटीची झाप, तिथं राबतो कष्टतो माझा शेतकरी बाप. अशा एकाहून एक सरस गेय कवितांनी नाकलगावकर मंत्रमुग्ध झाले. उत्स्फूर्त प्रतिसाद देत नाखलगावकरांनी खऱ्या अर्थाने शब्दांची दिवाळी साजरी केली.